**<u>उर्वरित उलटतपास शपथेवर सुरु</u>**
**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे ॲड. श्री. आय. डी. खान</u>**

३.  हे म्हणणे खरे आहे की वाई येथील न्यायालयात माझ्या नावच्या तीन केसेस आहेत. हे मला माहिती नाही की, या दाव्यातील मागणीप्रमाणेच त्याही दाव्यात मागणी केलेली आहे. हे मला माहिती नाही की, त्या दाव्यातील प्रतिवादी देखील शेतकरी आहेत. मी तुलसीदास बुवाजी जाधव यांना ओळखतो. मी त्यांचेविरूध्द दावा दाखल केलेला आहे. त्याचा क्रमांक मला सांगता येणार नाही. मी रामचंद्र विठोबा दुधाणे यांचे विरूध्द दावा दाखल केलेला आहे. मी त्यावेळी बाळू सखाराम जाधव याच्या घरात किती मुले आहेत व किती मुली आहेत याची चौकशी केली नव्हती. मी सदर दस्त करण्यापूर्वी जाहीर नोटीसीद्वारे ॲड. एस. के. पठाण यांचेमार्फत वृत्तपत्रातून हरकती मागविल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर जाहीर नोटीसीला ॲड. काळे व प्रतिवादींचे वकील यांचेतर्फे नोटीस उत्तर मला आले होते. सदर नोटीसचे उत्तर मिळालेनंतर मी त्याबाबत प्रतिवादीकडे चौकशी केली असता त्याने मला असे सांगितले की, मी त्या लोकांसोबत चर्चा करतो व ते चूकीची हरकत घेत आहेत. त्यावेळी पोपट जाधव / विजय जाधव व काकासाहेब सोनावणे यांनी हरकत घेतली होती.

४.  मी जमिन शेतीसाठी किंवा ती विकसीत करण्यासाठी घेणार होतो. हे मला सांगता येणार नाही की, सुरूवातीला मी शेती करण्याच्या उद्देशानेच व्यवहार केला होता. मला कलेक्टर अथवा प्रांत अधिकारी यांनी मी शेतकरी असल्याबाबतचा दाखला दिलेला नाही. मी सदर मिळकत वडीलार्जीत आहे व त्यात किती सह हिस्सेदार आहेत याची चौकशी स्वत: केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित साठेखत झालेपासून ताबा प्रतिवादीकडेच आहे. सदर मिळकतीमध्ये अदयापपावेतो मी कोणतेही पिक घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या ठिकाणी कधीही गेलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, योगेश शामलाल अग्रवाल व रमेशचंद अग्रवाल हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते दोघे पुणे येथे राहतात व मी देखील पुणे येथे राहतो. तथाकथित साठेखत हे पुणे येथे केले. सदर साठेखताचा स्टॅम्प मी खंडाळा येथून घेतला होता. स्टॅम्प कोणाकडून घेतला होता हे मला आठवत नाही. सदरचा दस्तातील मजकूर खंडाळा येथेच टाईप केला. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दस्त खंडाळा येथे टाईप केला व पुणे येथे नोटरी केला. हे म्हणणे खरे नाही की, नोटरी करताना प्रतिवादी हा नोटरी प्रदीपकुमार पोटे यांचेसमोर

उपस्थित नव्हते. हे मी आत्ता सांगू शकत नाही की, नोटरी प्रदीपकुमार पोटे यांना साक्षीदार म्हणून तपासणार की कसे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दस्तामध्ये खरेदी करण्याचे कारण व विक्री करण्याचे कारण नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा दस्त खोटा आहे. मला दुस-या दोन प्रकरणांमधील मिळकती शिंदेवाडी येथील आहेत किंवा कसे हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा व प्रतिवादीचा भविष्यात खरेदी विक्रीचा कोणताही व्यवहार ठरला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी व्यवहार झाला त्यावेळी सातबारा उता-यावर केवळ आणेवारी होती.

५. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मण विठ्ठल दुधाणे हे माझ्या ओळखीचे होते. हे मला माहीत नाही की, ते प्रतिवादीचे सख्खे मामा आहेत. हे मला माहीती नाही की, ते जानेवारी २०११ मध्ये अत्यंत आजारी पडले. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे कुटुंब त्यांना सांभाळत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सातबारा उता-यावर लक्ष्मण दुधाणे यांचे नाव होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्यांचा हिस्सा वेगळा होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचे मामा दुधाणे हे इतके आजारी होते की जागेवर खिळून होते व त्यांना औषोधोपचाराची गरज होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी प्रतिवादीला सांगितले की, त्यांच्यासाठी शेठजीकडून पैसे उसणवार घे व तशी उसणवार पावती तुझ्या नावे करून घे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर प्रतिवादीने मला सांगितले की, त्याचे मामा आजारी आहेत व त्यांना चालता फिरता येत नाही आणि त्यांना सामाईकातील क्षेत्र विकायचे आहे व तुम्ही त्याकरीता पैसे उसणवार दया. हे म्हणणे खरे नाही की, तुम्ही पैसे दिल्यास मी त्यांना पोच करेन. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीस म्हणालो की, दुधाणे यांच्यावतीने तुला काहीतरी लिहून दयावे लागेल. हे म्हणणे खरे नाही की, मामाच्या आजारपणामुळे प्रतिवादीने दि. २१.०१.२०११ रोजीच्या तथाकथीत दस्तावर खंडाळा येथे सही केली. हे म्हणणे खरे नाही की, सदर दस्तात काय काय लिहून घेतले आहे याची माहिती प्रतिवादीला दिली नाही व दस्ताची प्रत दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला लिहिता वाचता येत नाही आणि त्याला केवळ सही करता येते. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा गैरफायदा घेवून मी खोटया मजकूराचे साठेखत प्रतिवादीकडून लिहून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, सदर दस्तावर माझ्याच नातेवाईकांना साक्षीदार म्हणून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर परस्पर केव्हातरी सदर दस्त नोटरी केला. हे म्हणणे खरे नाही की, बोगस दस्तऐवजावरून मला कोणताही मालकी किंवा इतर हक्क निर्माण होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, रक्कम रू.१,४०,०००/-

प्रतिवादीने लक्ष्मण विठोबा दुधाणे यांना दिले. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्षात प्रतिवादीबरोबर माझा कोणताही व्यवहार ठरलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत माझा कब्जा आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटया साठेखतावरून मी खोटे कारण दाखवून हा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला फसवून मी त्याची एकत्र कुटुंबाची मिळकत घेण्याच्या प्रयत्नात होतो. हे म्हणणे खरे नाही की, उसणवार रक्कम देवून त्यावर व्याज आकारून मी उसणवारीचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सावकारीचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत साठेखताली संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसताना मी खोटा दावा दाखल केला आहे व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई. (ए. ए. पाचरणे)

दिनांक : ०८.०८.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.